# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF /AZ//AUR/U/ 174 /2009 / 08/                    Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Sunil Omprakash Bharuka,Surbhi Computers, 9, Singapur Complex, New Gulmandi Road, Aurangabad.( Con.No.490011624631)

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Sunil Omprakash Bharuka, Surbhi Computers, 9, Singapur Complex, New Gulmandi Road, Aurangabad.

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **27.01.2009 at 12.50 Hours .**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above

Copy to:-

Shri Sunil Omprakas
Bharuka,Surbhi Computers,
9, Singapur Complex, New Gulmand Road,
Aurangabad.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७४/२००९/०८**

**तक्रार दाखल दिनांक ;- १३/०१/२००९**

**निकाल दिनांक ;- ०३/०३/२००९**

**श्री सुनील ओमप्रकाश भारूका,**
**सुरभी कॉम्प्युटर्स,९ सिंगापुर कॉम्लेक्स,**
**न्यु गुलमंडी रोड, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६२४६३१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १३/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २७/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराचे न्यु गुलमंडी, औरंगाबाद येथे कॉम्प्युटर चे दुकान आहे.त्याचा सरासरी विज वापर ८० ते १०० युनीट प्रतिमहीना असुन त्यांना जुन २००६ पर्यंत महावितरण कंपनीतर्फे वीज वापरानुसार बिल देण्यात येत होते. महावितरण कंपनीतर्फे त्यांना जानेवारी २००७ मध्ये वाढीव व चुकीचे बिल आकारण्यात आले.या वाढीव बिलाबाबत त्यांनी महावितरणच्या संबंधित विभागाकडे तक्रार केल्यानंतर त्यांना पार्टपेमेंट म्हणुन १२०००/- रूपये भरण्याचे सांगण्यात आले. वीज पुरवठा खंडित होऊ नये म्हणुन त्यांनी ही रक्कम भरली असल्याचे म्हटले आहे.अर्जदाराने मीटर टेस्टींग रक्कम भरून देखील त्यांचे मिटर तपासणी करण्यात आलेली नसल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे. सप्टेबर २००७ मध्ये त्याचे जुने मीटर बदलण्यात आले.नवीन मीटर बसविल्यानंतर त्यांना वीज वापराचे योग्य असे बिल येत असल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे. अर्जदाराने त्याला जुन २००६ ते सप्टेबर २००७ च्या काळात देण्यात आलेल्या चुकीच्या व वाढीव बिलाबाबत केलेल्या तक्रारीची दखल महावितरण कंपनीने न घेतल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन अतिरिक्त भरलेली रक्कम परत करण्याबाबत तसेच देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलामुळे त्यांचा विज पुरवठा खंडीत करू नये म्हणुन आदेश देण्याची विंनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २७/०१/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री सनील भारूका उपस्थित होते. महावितरणचे नोडल अधिकारी श्री राठौर तसेच लेखा विभागाचे श्री पत्तेवार उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी दाखल

केलेल्या जवाबानुसार अर्जदाराचे मीटर २९/०९/२००७ रोजी बदलण्यात आले व त्यांना देण्यात आलेली वीज बिले ही नियमाप्रमाणे व योग्य असल्याचे नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जवाबात म्हटले आहे.अर्जदाराने वादातीत मीटर चाचणी करण्यासाठी रूपये १००/- भरले असुन, चाचणी अहवालाबाबत मंचाने विचारणा केली असता सदरील मीटरचा टेस्टींग अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे नोडल अधिकारी यांनी मान्य केले. मंचाने अर्जदाराच्या तक्रारीचे मंचात निवारण होईपर्यत त्याचा वीज पुरवठा खंडीत न करण्याचा अंतरिम आदेश पारीत केला व पुढील सुनावणी ०३/०२/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक ०३/०२/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराचे जुने मीटर सापडत नसल्याचे सांगत त्यांनी टेस्टींग अहवाल दाखल करण्याबाबत मुदतवाढ मागितली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी दिनांक १०/०२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक १०/०२/२००९ रोजी अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराचे जुने मीटर सापडत नसल्यामुळे व त्याचे टेस्टींग करण्यात आले नसल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगितले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते अर्जदाराने वाणीज्य वापरासाठी ०५/०९/२००३ रोजी वीज पुरवठा घेतला आहे.दिनांक २९/०९/२००७ रोजी अर्जदाराचे ०१४७१५९ या क्रमांकाचे जुने मीटर बदलण्यात आल्यानंतर त्याजागी नवीन मीटर क्रमांक ७४४८७९ हे बसविण्यात आले. दिनांक ०८/११/२००७ रोजी अर्जदाराने त्याचे मीटर जलदगतीने फिरत असल्याची तक्रार उपकार्यकारी अभियंता पावर हाऊस सबडिव्हीजन

यांच्याकडे केली असल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनीने दिनांक ०४/०८/२००७ रोजी या वादातीत मीटरची चाचणी करण्यासाठी अर्जदारास रूपये १००/-भरण्याचे कोटेशन दिले ज्याचा भरणा त्यांनी केलेला असल्याचे दिसुन येते.अर्जदाराने मीटर चाचणीसाठी रूपये १००/- रक्कम भरल्यानंतरही महावितरण कंपनीतर्फे मीटर तपासण्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांना संधी देवुनही त्यांनी सदरील मीटरचा चाचणी अहवाल मंचात दाखल केला नाही. व दिनांक १०/०२/२००९ च्या सुनावणीच्या वेळी त्यांनी जुने मीटर क्रमांक १४७१५९ सापडत नसल्याचे लेखी पत्र दिले आहे.नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या सी.पी.एल. चे निरिक्षण केल्यानंतर असे आढळुन येते की, महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास जुन २००६ ते २९/०९/२००७ या काळातील वीज बिलाबाबत अर्जदाराची मुळ तक्रार आहे.अर्जदारचा जुन २००६ च्या अगोदर१२ महीन्याचा व सप्टेबर २००७ पुढील १२ महीन्याचा सरासरी वीज वापर पाहता तो खालील प्रमाणे आढळुन येतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जुन २००५ ते जुन २००६ | १५७९ | १२१ |
| १) | जुलै २००६ ते २९/०९/२००७ | ६३३५ | ४५२ युनीट |
| ३) | ऑक्टोबर २००७ ते ऑक्टोबर ०८ | १२५० | ९६ युनीट |

अर्जदाराच्या सी.पी.एल.वर नोंदविल्या गेलेल्या वरील वीज वापरावरून जुलै २००६ ते २९/०९/२००७ या काळात वीजेचा वापर हा जास्त नोंदविलागेला असल्याचे दिसुन येते. महावितरणच्या कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्या स्थळपाहणी अहवालात अर्जदाराचा वीज भार हा ६८८ वॅट असल्याचे म्हटले आहे. अर्जदारने (भारनियमाचे ६ तास) दिवसातील १८ तासात जरी पुर्ण वीज भार वापरला तरी तो वरील सरासरीपेक्षा (४५२ युनीट) कमी असल्याचे तांत्रीक दृट्या स्पष्ट होते. महावितरण कंपनीकडुन अर्जदाराने मीटर

टेस्टींगची रक्कम भरल्यानंतरही मीटरची टेस्टींग केलेली नसल्याचे आढळुन येते.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार भारनियमाचा कालावधी लोड फॅक्टर व जोडलेला वीज भार लक्षात घेता अर्जदारास १२९ युनिट प्रतिमहा प्रमाणे वीज बिल आकारणी करणे तांत्रीक दृट्या योग्य राहील असे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास जुन २००६ ते २७/०९/२००७ या काळात आकारलेली सर्व वीज बिल रद्द करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास वरील काळासाठी सरासरी १२९ युनीट प्रतिमाह प्रमाणे वीज बिल आकारणी करावी अर्जदारास तीस दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे.

३) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

४) महावितरण कंपनीने अर्जदाराकडुन मीटर चाचणी म्हणुन स्विकारलेली रक्कम रूपये १००/- तीस दिवसात परत करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७४/२००९/०८** **दिनांक :-**

**प्रति,**
**श्री सुनिल ओमप्रकाश भारूका,**
**सुरभी कॉम्प्युटर्स,९ सिंगापुर कॉम्लेक्स,**
**न्यु गुलमंडी रोड, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७४/२००९/०८ )

आपण दिनांक १३/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**